RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक ३७] बुधवार, मार्च २३, २०२२/चैत्र २, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ९१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृहनिर्माण विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक २३ मार्च २०२२.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१.**

क्रमांक एमएमआर-२०२२/प्र.क्र.११/झोपसु.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, विवक्षित महानगरपालिका व नगरपालिकेच्या क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरिता, महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र ( सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास ) अधिनियम, १९७१ ( १९७१ चा महा.२८ ), याच्या कलम ३ अ च्या पोट-कलम ( १ ) व ( २ ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, शासकीय अधिसूचना, गृहनिर्माण विभाग, क्रमांक एमएमआर-२०२०/प्र.क्र.५६/२०२०/झोपसु, दिनांक ८ सप्टेंबर, २०२० ( यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे ) अन्वये मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ( बृहन्मुंबई महानगरपालिकेचे क्षेत्र वगळून ) ( यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण" असा करण्यात आला आहे ) नियुक्त केले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास, झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरिता पालघर नगरपरिषद व बोईसर ग्रामपंचायत यांचा समावेश असलेले क्षेत्र, उक्त झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रामध्ये समाविष्ट करणे इष्ट आहे असे वाटते;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र ( सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास ) अधिनियम, १९७१ ( १९७१ चा महा.२८ ), याच्या कलम ३ अ च्या पोट-कलम ( १ ) व ( २ ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अधिसूचनेमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :-

उक्त अधिसूचनेतील, परिच्छेद ४ मध्ये, उप-परिच्छेद ( ब ) मध्ये "व कर्जत या नगरपरिषदा" ऐवजी "कर्जत व पालघर या नगरपरिषदा आणि बोईसर ग्रामपंचायत" असे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सु. बा. तुंबारे,**
शासनाचे उप सचिव.

## HOUSING DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032

dated the 23rd March 2022.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA SLUM AREAS (IMPROVEMENT, CLEARANCE AND REDEVELOPMENT) ACT,1971.

No. MMR-2022/C.R.11/Zopasu.—Whereas, the Government of Maharashtra has, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 3A of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act, 1971 (Mah.XXVIII of 1971), issued the Government Notification, *vide* Housing Department, No.MMR/2020/C.R.56/2020/Zopasu, dated the 8th September 2020 (hereinafter referred to as "the said Notification"), to appoint the Mumbai Metropolitan Region Slum Rehabilitation Authority (excluding the Brihan-Mumbai Municipal Corporation Area) (hereinafter referred to as "the said Authority"), for implementing the Slum Rehabilitation Schemes in the areas within the limits of certain Municipal Corporation and Municipal Councils;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to include the areas comprising of the Municipal Council of Palghar and Grampanchayat of Biosar, within the jurisdiction of the said Authority, for implementing the Slum Rehabilitation Schemes under the said Act in the said areas;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and (2) of section 3A of the Maharashtra Slum Areas ( Improvement, Clearance and Redevelopment) Act,1971 (Mah.XXVIII of 1971), the Government of Maharashtra hereby amends the said notification, as follows, namely :-

In the said Notification, in paragraph 4, in sub paragraph (b) for the words "and Karjat" the words "Karjat and Palghar and Grampanchayat of Boisar" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. B. TUMBARE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.